# प्रेस नोट

## विमा पॉलीसीचा लाभ मिळवुन देण्याचा बहाणा करुन १.५१ कोटी रुपयांची फसवणुक करणा-या टोळीस अटक

फिर्यादी नामे विजय केशव कानिटकर, वय-८४,रा-११७९/२ मॉर्डन कॉलेज जवळ, शिवाजीनगर पुणे-४११००५, यांना मार्च २०१८ पासून इसम नामे बद्री प्रसाद, कोठारी, घोष प्रितम, सिताराम केसरी, चतुर्वेदी व अजय शर्मा अशा वेगवेगळया नावाने IRDA Chennai या इंश्युरंस कंपनीमधुन बोलत असल्याचे सांगुन अर्जदार यांचा इंश्युरंस पॉलिसी विषयी माहिती सांगुन त्यांच्या जुन्या इंश्युरंस पॉलिसी बंद झाल्या असुन सदरच्या पॉलीसीचे व्याज, लाभ व बोनसचे तीन कोटी पेक्षा जास्त पैसे डिसेंबर २०१२ पासुन मिळणार आहेत. त्यासाठी काही नवीन पॉलिसी घ्याव्या लागतील तसेच काही रक्कम फंड रिलीज करण्यासाठी,टॅक्स म्हणुन भरावे लागतील. ते पैसे भरल्याशिवाय benefits व बोनसची रक्कम मिळणार नाही असे सांगितल्याने फिर्यादी यांनी बंद झालेल्या इन्शुरन्स पॉलीसीचे व्याज, बोनस व इतर लाभ मिळणेकरिता आरोपितांनी सांगितलेली रक्कम भरण्याचे मान्य केले. फिर्यादी यांनी मार्च २०१८ ते नोव्हेंबर २०१८ या कालावधीमध्ये आरोपींनी दिलेल्या वेगवेगळया बँकेच्या खात्यांमध्ये एकुण रक्कम रु. १,५१,९२,४००/- रु. (एक करोड एक्कावन्न लाख ब्यायन्यव हजार चारशे रुपये) एवढी रक्कम भरली होती. परंतु फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचा लाभ, व्याज व बोनस मिळाला नाही. त्यामुळे फिर्यादी यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी लेखी फिर्याद दिली असुन ती शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं १९/२०१९ भा.द.वि कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर करित असताना तांत्रीक माहितीच्या आधारे दाखल गुन्हयातील आरोपी हे गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथे असलेबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सायबर पोलीस स्टेशन कडील एक पथक गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथे जावुन आरोपींचा शोध घेवुन आरोपी नामे १) सुमित वत्स टेकचंद शर्मा वय-३१, रा. १३, प्रेम इन्क्लेव्ह, मेरठ रोड, गाझियाबाद उत्तर प्रदेश, २) अंकुरसिंग पालेराम खुशवाह वय-३२, रा.सदर ३) दुर्गेश सुभाषचंद शर्मा वय-२६, रा घर नं ५५९, गल्ली नंबर-२, क्रिष्णानगर, मेरठ रोड, गाझियाबाद, उत्तर प्रदेश यांना गाझियाबाद येथुन दिनांक १४/०३/२०१९ रोजी अटक करुन मा.जिल्हा न्यायालय गाझियाबाद, यांचेकडुन ट्रान्झीट, रिमांड घेवुन, वरिल आरोपीतांना शिवाजीनगर पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आले आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे शहर हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे श्री. संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, श्री.निलेश मोरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.राधिका फडके, पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे, स.पो.नि.सागर पानमंद, पो.हवा. अस्लम अत्तार, पो.ना. राजकुमार जाबा, पो.शि. नवनाथ जाधव, नितीन चांदणे, अमित औचरे, बाबासाहेब कराळे, यांनी केली आहे.

(संभाजी कदम)
पोलीस उप आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे,
पुणे शहर

Scanned by CamScanner